| | |
|---|---|
| MHKO110017472022 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. २२४/२०२२ मधील</u>**<br>**<u>निशाणी क्र. ६८ वरील आदेश</u>**<br>**(श्री.श्रीमंधर धनपाल सोळांकुरे विरुध्द श्री .धनपाल गणपती सोळांकुरे वगैरे )** |

प्रतिवादी क्रमांक १ व ६ यांनी सदरचा अर्ज कैफियत दाखल करणेसाठी झालेला विलंबा माफ करुन कैफियत अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी यांचा अर्ज व त्यावरील वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले . दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**०३.** प्रतिवादी यांचे असे कथन आहे की , प्रस्तुत प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक कैफियत/म्हणणे देणेस टाळाटाळ केलेली नाही. प्रस्तुत प्रतिवादी यांना महत्वाचे व आवश्यक कागदपत्रे न मिळालने सदर कामी म्हणणे देणेस विलंब झालेला आहे . प्रतिवादी यांना कैफियत/म्हणणे दाखल करणेची संधी मिळालेस दावा गुणदोषावर चालणेस मदत होणार आहे. प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे दाखल करुन घेतलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रतिवादी यांची कैफियत दाखल न करुन घेतल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** वादी यांनी सदर अर्जास निशाणी क्र. ६८ चे पाठीमागील बाजूस म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व मजकुर नाकारला आहे. प्रतिवादींनी कैफियत व म्हणणे दाखल करणेस झालेल्या विलंबाचे नमूद केलेले कारण संयुक्तीक नाही. केवळ वादींना त्रास देणेच्या उददेशाने प्रस्तुत प्रतिवादींनी कैफियत व म्हणणे दाखल करणेस विलंब केलेला आहे. सबब, प्रस्तुचा अर्ज नामंजूर करणेत यावा. याउलट त्यांनी अर्ज मंजूर केल्यास सदर प्रतिवादी यांना दंड करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, प्रतिवादीविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत झालेला नाही. परंतू तरीदेखिल दिवाणी प्रक्रिया संहितेतील तरतूदीनुसार

प्रतिवादीने ३० दिवसांमध्ये अथवा जास्तीत जास्त ९० दिवसांमध्ये कैफियत दाखल करणे अनिवार्य आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, प्रतिवादी क्रमांक १ हे दिनांक १८.११.२०२२ व प्रतिवादी क्रमांक ६ हे दिनांक २०.०२.२०२३ रोजी त्यांचे वकीलांमार्फत हजर झालेले आहेत. त्यावेळी त्यांना कैफियत दाखल करणेस मुदत दिलेली होती. परंतू त्यानंतर उपरोक्त मुदतीत प्रतिवादींनी कैफियत दाखल केलेली नाही. सबब, प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणे कामी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे जरी कैफियत नाही असा आदेश झालेला नसला तरी प्रतिवादीस परवानगी देणेसाठी प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णत करणे योग्य राहील.

**०६.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरु वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी व व कायम मनाईकरीता दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता प्रतिवादी यांची कैफियत आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांनी आपली कैफियत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे . त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांनी केलेल्या उशीरासाठी काही अंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते . सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**- आ दे श -**

**१)** प्रतिवादी यांचा निशाणी क्र.६८ वरील अर्ज, वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/-(अक्षरी रुपये दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2023.06.30 11:23:00 +0530

ठिकाण – पेठवडगांव　　( एस.डी.शिरसाट )

दिनांक - २८.०६.२०२३　　०२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर. पेठवडगांव